## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०१/२०१८

**१) संगनमत करून भांडण करून ट्रकच्या काचाला दगड मारून काच फोडुन नुकसान केल्यानेगुन्हा नोंद. :-**

दिनांक २६/०१/२०१८ चे १९.४५ वाजता. दरम्यान यातील आरोपी व इतर ०३ इसमांनी संगनमत करून फिर्यादीचे मालकीचे बोरवेल ट्रक क्र. ए ०१/एम क्यु ४४४७ ला रस्त्यामध्ये अडवुन चालक व सोबतचे ०२ साथीदारांना धक्का-बुक्की देत शिवीगाळ करून बळजबरीने जिवे मारण्याची धमकी देत १,०००/रु देण्यास भाग पाडले व ट्रक चे समोरील काचाला दगड मारून काच फोडुन नुकसान केल्याने फिर्यादी शकर लक्ष्मण पाखमोडे वय ३६ वर्ष रा. मानेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३८६,३४१,,४२७,५०६,३४ ३६३,३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. बन्सोडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) भांडणाच्या कारणा वरून मारपीट करून बडजबरीने ट्रक मध्ये बसवुन नेल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक २६/०१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी हा त्याचे कुटुंबासह टाटा सुमो क्र. एमएच ३१/एच ९४७६ ने लाखांदुर कडुन साकोली कडे जात असतांना आरोपीचे ताब्यातील बोरवेल ट्रक क्र. ए ०१/एम क्यु ४४४७ ची कट लागल्यामुळे फिर्यादी व आरोपीतांमध्ये झालेल्या झगडयाच्या कारणा वरून फिर्यादीस आरोपीतांनी मारझोड करून बडजबरीने ट्रक मध्ये बसवुन आपल्या सोबत बोरगाव फाटा येथे नेले व परत मारझोड केल्याने फिर्यादी नितीन पृथ्वीवीराज ठवरे वय २९ वर्ष रा. लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३६३,३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. बन्सोडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) नगदी पैसे व सोन्याच्या दागिन्याची चोरी . :-**

दिनांक २६/०१/२०१८ चे १३.०० ते दि. २७/०१/२०१८ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा गोसे खुर्द येथे कुटुंबासह गेला होता, त्याचे घरी कोणीही हजर नसल्याचे पाहुन कोणीतरी अज्ञात चोराने, कुनिही नसल्याची संधी साधुन घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून आलमारीच्या पल्याला लोखंडी वस्तुने वाकवुन त्यातील १ सोन्याची नथ वजन ३ ग्रॅम, सोन्याचे रिंग (झुमके) वजन १ ग्रॅम व नगदी २,५००/रु. असा एकुन १३,५००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४ ,४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) स्कुटरच्या धडकेत एक जखमी:-**

दिनांक २७/०१/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ३६७६ ने श्रीमती मंदाबाई टिकाराम चाचेरे वय ५० वर्ष रा. पहेला हिस मोटार सायकल थांबवीली असता यातिल अरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला मागेहुन धडक मारून मंदाबाई चाचेरे हिचे डाव्या हाताच्या मनगटाला मार लागुन खाली पडुन छातीला मार लागल्याने फिर्यादी प्रकाश माधव बिलवने वय ४६ वर्ष रा. चिचाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गि-हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**५) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :-**

दिनांक २७/०१/२०१८ चे ११.४५ वाजता. दरम्यान यातील मृतक सुखदेव मंगरूजी बानेवार वय ४९ वर्ष रा. बेटाळा हा त्याचे घरी स्टोव्हच्या भडका होवुन जळाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. अजनी नागपुर शहर येथे मर्ग क्रमांक ००/१८ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. गोमासे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

६) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २७/०१/२०१८ चे १४.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पीवळी वाहन ही कारधा चौक जवळ येणारे जाणारे लोकांना अडथडा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. गोमासे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. राठोड पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

७) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २७/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ११ लिटर हातभंट्टी दारू किंमती ११,००/—रु चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २७/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी— ०२ तीन सिटर वाहनांवरती— ०६ केसेस व ईतर वाहनांवरती — ६२ केसेस करण्यात आले आहे.

( पो.नी. एस. बि कदम )
वाचक शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र. ७०२११८८१८५५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.